# विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ अधिनियम, २००८
## (२००९ चा अधिनियम क्रमांक ९)

( १४ ऑक्टोबर २०१५ रोजी यथाविद्यमान)

[१७ जानेवारी, २००९]

**विज्ञान व अभियांत्रिकीमधील मूलभूत संशोधनास चालना देण्यासाठी मंडळ घटित करण्याकरिता आणि अशा संशोधनाचे काम करीत असलेल्या व्यक्तींना, शैक्षणिक संस्थांना, संशोधन व विकास प्रयोगशाळांना, औद्योगिक संस्थांना आणि इतर एजन्सींना अशा संशोधनासाठी वित्तीय साहाय्य देण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

तो, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, संसदेद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास, विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ अधिनियम, २००८ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर ,— **व्याख्या.**

(क) "मंडळ" याचा अर्थ, कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेले विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ, असा आहे ;

(ख) "अध्यक्ष" याचा अर्थ, मंडळाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) "निधी" याचा अर्थ, कलम १०च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेला विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन निधी, असा आहे ;

(घ) "सदस्य" याचा अर्थ, मंडळाचा सदस्य, असा आहे आणि त्यामध्ये अध्यक्षाचा समावेश होतो ;

(ङ) "अवेक्षण समिती" याचा अर्थ, कलम ५ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेली तज्ज्ञांची अवेक्षण समिती, असा आहे ;

(च) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(छ) "सचिव" याचा अर्थ, कलम ४ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला मंडळाचा सचिव, असा आहे.

प्रकरण दोन

**विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ**

**३.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ या नावाचे एक मंडळ घटित करील. **मंडळ घटित करणे व त्याचे विधिसंस्थापन.**

(२) मंडळ, या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, संविदा करण्याच्या अधिकारांसह उत्तराधिकाराची अखंड परंपरा व सामाईक मुद्रा असणारे वरील नावाचे एक निगम निकाय असेल आणि उक्त नावाने, त्याला किंवा त्याच्याविरुद्ध दावा करता येईल.

(३) मंडळ पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल, ते असे :—

(क) विज्ञान व तंत्रज्ञान विभागातील भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध–अध्यक्ष ;

(ख) सदस्य-सचिव, नियोजन विभाग, पदसिद्ध-सदस्य ;

(ग) जैव-तंत्रज्ञान विभागातील भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध-सदस्य ;

(घ) वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन विभागातील भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध–सदस्य ;

(ङ) भूविज्ञान मंत्रालयातील भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध-सदस्य ;

(च) वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागातील, भारत सरकारचा, सचिव किंवा त्याची नामनिर्देशिती, पदसिद्ध-सदस्य ;

(छ) आरोग्य संशोधन विभागातील भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध-सदस्य ;

(ज) शैक्षणिक संस्थांतील विविध ज्ञान शाखांमधील वैज्ञानिक संशोधनातील अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून केंद्र सरकारने नियुक्त करावयाचे तीनपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य ;

(झ) शासकीय संशोधन प्रयोगशाळांमधील विविध ज्ञान शाखांमधील वैज्ञानिक संशोधनातील अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून केंद्र सरकारने नियुक्त करावयाचे तीनपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य ;

(ञ) उद्योग, विज्ञान व तंत्रज्ञान यांवरील आंतरराष्ट्रीय प्रकल्प, सामाजिक-आर्थिक क्षेत्रे आणि इतर शासकीय संशोधन प्रयोगशाळा यांमधील विविध ज्ञानशाखांमधील वैज्ञानिक संशोधनातील अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून केंद्र सरकारने नियुक्त करावयाचे चारपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य ;

(४) मंडळाचे मुख्यालय, दिल्ली येथे किंवा राष्ट्रीय राजधानी क्षेत्रामध्ये असेल.

(५) पोटकलम (३) च्या खंड (ज) ते (ञ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांची अर्हता व अनुभव, पदावधी व भत्ते, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(६) अध्यक्ष, मंडळाच्या बैठकींचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याबरोबरच विहित करण्यात येतील किंवा मंडळाद्वारे त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

(७) मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ पुढील कारणांवरून विधिअग्राह्य ठरणार नाही :—

(क) मंडळामध्ये कोणतेही पद रिक्त असणे किंवा मंडळाच्या रचनेमध्ये कोणताही दोष असणे ;

(ख) मंडळाचा सदस्य म्हणून कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीमध्ये कोणताही दोष असणे ;

(ग) प्रकरणाच्या गुणवत्तेस बाधक न ठरणारी मंडळाच्या कार्यपद्धतीतील कोणतीही अनियमितता.

**मंडळाचे सचिव व इतर अधिकारी व कर्मचारी.**

**४.** (१) मंडळ, केंद्र सरकारशी विचारविनिमय करून, मंडळाचा सचिव म्हणून, भारत सरकारच्या अपर सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या एखाद्या प्रभुत्वसंपन्न वैज्ञानिकाची नियुक्ती करील.

(२) मंडळ, या अधिनियमाअन्वये त्याची कामे कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी त्याला आवश्यक वाटतील अशा अन्य अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करील.

(३) मंडळाच्या सचिवांचे आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यांसह त्यांची अर्हता व अनुभव, सेवेच्या अटी व शर्ती ह्या मंडळाने केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) मंडळास, मंडळाने केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटीं व शर्तींवर आणि पारिश्रमिकांवर सल्लागार, अभ्यागत वैज्ञानिक म्हणून भारतातील किंवा भारताबाहेरील अशा दोन्ही ठिकाणातील कर्मचाऱ्यांच्या सेवा घेता येतील आणि ते देशामधील त्यांची कामे सुरळीतपणे करतील.

**तज्ज्ञांची अवेक्षण समिती.**

**५.** (१) याबाबत केलेल्या नियमांस अधीन राहून, मंडळ, मंडळाला सल्ला देण्यासाठी व साहाय्य करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती, प्रभुत्वसंपन्न वैज्ञानिक व शिक्षणतज्ज्ञ यांची मिळून बनणारी एक तज्ज्ञांची अवेक्षण समिती घटित करील.

(२) अवेक्षण समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :—

(एक) प्रभुत्वसंपन्न व आंतरराष्ट्रीय ख्यातीचा वैज्ञानिक—अध्यक्ष ;

(दोन) विज्ञान व तंत्रज्ञान विभागातील भारत सरकारचा सचिव-पदसिद्ध-उपाध्यक्ष ;

(तीन) भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी, भारतीय विज्ञान अकादमी व भारतीय राष्ट्रीय अभियांत्रिकी अकादमी यांचे अध्यक्ष-पदसिद्ध-सदस्य ;

(चार) विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रातील प्रख्यात तज्ज्ञांमधून केंद्र सरकारने नियुक्त करावयाचे तीनपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य; आणि

(पाच) मंडळाचा सचिव-पदसिद्ध-सदस्य.

**६.** (१) मंडळ याबाबत केलेल्या नियमांना अधीन राहून, या अधिनियमाअन्वये त्याची कर्तव्ये व कामे कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा समित्या नियुक्त करू शकेल. **मंडळाच्या समित्या.**

(२) मंडळाला, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे व त्या संख्येतील, ज्या व्यक्ती, मंडळाच्या सदस्य नाहीत अशा व्यक्तींना पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्याचा अधिकार मंडळाला असेल, आणि अशा प्रकारे स्वीकृत करून घेतलेल्या व्यक्तींना समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्याचा व समितीच्या कामकाजामध्ये भाग घेण्याचा हक्क असेल.

**७.** (१) मंडळ, विज्ञान व अभियांत्रिकीच्या उदयोन्मुख क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाचे नियोजन, प्रचालन करणे व त्यास निधी पुरविणे यांकरिता प्रमुख बहु-विद्याशाखीय संशोधन निधी पुरविणारी एजन्सी म्हणून कार्य करील. **मंडळाचे अधिकार व कामे.**

(२) इतर गोष्टींबरोबरच मंडळाचे अधिकार व कामे यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल :—

(एक) उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये आंतरराष्ट्रीयदृष्ट्या स्पर्धाक्षम संशोधनाचे नियोजन, प्रचालन व निधीपुरवठा यांसाठी प्रमुख बहु-विद्याशाखीय संशोधन एजन्सी म्हणून सेवा करणे ;

(दोन) अवेक्षण समितीने केलेल्या शिफारशी व सूचना यांवर विचार करणे व निर्णय घेणे ;

(तीन) मुख्य आंतर-ज्ञान संशोधन क्षेत्रे आणि व्यक्ती, गट किंवा संस्था निश्चित करणे आणि संशोधन करण्यासाठी त्यांना निधी पुरवणे ;

(चार) संशोधनास चालना देण्यामध्ये ज्यांचा बहुगुणित परिणाम होईल अशा संस्थांचा सहभाग असणाऱ्या निश्चित केलेल्या विविध क्षेत्रांमध्ये राष्ट्रीयदृष्ट्या समन्वित कार्यक्रम विकसित करणे ;

(पाच) वैज्ञानिक व्यासंगासाठी पायाभूत सुविधा व पोषक वातावरण तयार करण्यात साहाय्य करणे ;

(सहा) विज्ञान व अभियांत्रिकी यांमधील मूलभूत संशोधनास चालना देण्यासाठी शैक्षणिक संस्था, संशोधन व विकास प्रयोगशाळा आणि उद्योग यांच्यामध्ये सहकार्य निर्माण करणे ;

(सात) आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा अंगीकार करून त्याद्वारे संनियंत्रण व मूल्यमापन यांसह संशोधनासाठी तत्परतेने निधी पुरविण्याकरिता व्यवस्थापन यंत्रणा विकसित करणे ;

(आठ) जेथे जेथे आवश्यक असतील किंवा इष्ट वाटतील तेथे तेथे आंतरराष्ट्रीय सहयोगी प्रकल्पांमध्ये सहभाग घेणे ; आणि

(नऊ) विद्यमान विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन परिषद योजनेअंतर्गत केंद्र सरकारने हाती घेतलेले किंवा केंद्र सरकारद्वारे निधी पुरविलेले मूलभूत संशोधन प्रकल्प व कार्यक्रम हाती घेणे आणि ते चालविणे.

(३) मंडळ, व्यक्तींना, शैक्षणिक संस्थांना, संशोधन व विकास प्रयोगशाळांना, उद्योगांना व इतर संघटनांना अनुदान व कर्ज या स्वरूपात, कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांकरिता वित्तीय साहाय्य पुरवू शकेल.

## प्रकरण तीन

## **वित्तीय साहाय्य मंजूर करण्यासाठी अर्ज करणे**

**८.** (१) कलम ७ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी वित्तीय साहाय्य उपलब्ध करण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात मंडळाकडे अर्ज करण्यात येईल. **वित्तीय साहाय्य उपलब्ध करण्यासाठी अर्ज.**

(२) मंडळ, अर्जाची तपासणी केल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर किंवा स्पष्टीकरण मागविल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, एकतर वित्तीय साहाय्य मंजूर करील किंवा ते नाकारील.

## प्रकरण चार

## **वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा**

**९.** केंद्र सरकार, याबाबत कायद्याद्वारे संसदेने योग्य विनियोजन केल्यानंतर, त्या सरकारला आवश्यक वाटेल अशा रकमेची अनुदाने व कर्जे मंडळाला देऊ शकेल. **केंद्र सरकारद्वारे अनुदाने व कर्जे.**

**विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन निधी.** **१०.** (१) विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन निधी या नावाने ओळखला जाणारा एक निधी स्थापन करण्यात येईल आणि या निधीत पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(क) कलम ९ अन्वये केंद्र सरकारने मंडळाला दिलेली कोणतीही अनुदाने व कर्जे ;

(ख) इतर कोणत्याही मार्गाने मिळालेल्या देणग्यांसह मंडळाला मिळालेल्या कोणत्याही रकमा ;

(ग) निधीतून दिलेल्या रकमांची केलेली वसुली ; आणि

(घ) निधीतील रकमेच्या गुंतवणुकीमधून मिळणारे कोणतेही उत्पन्न.

(२) पुढील खर्च भागविण्यासाठी निधीचा विनियोग करता येईल :—

(क) या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेल्या उद्दिष्टावरील व प्रयोजनांवरील खर्च ;

(ख) मंडळाचे सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व इतर खर्च ;

(ग) संमंत्रकांचे व अभ्यागत वैज्ञानिकांचे पारिश्रमिक ; आणि

(घ) या अधिनियमाअन्वये मंडळाची कामे पार पाडताना, मंडळाने केलेला खर्च.

**अर्थसंकल्प.** **११.** मंडळ, मंडळाच्या अंदाजित जमा रकमा व खर्च दर्शविणारा, पुढील वित्तीय वर्षाचा त्याचा अर्थसंकल्प, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये विहित करण्यात येईल अशा वेळी, तयार करील आणि तो केंद्र सरकारकडे पाठवील.

**वार्षिक अहवाल.** **१२.** मंडळ, मागील वित्तीय वर्षामधील त्याच्या कामकाजाचा संपूर्ण लेखा देणारा त्याचा वार्षिक अहवाल, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि प्रत्येक वित्तीय वर्षात विहित करण्यात येईल अशा वेळेत तयार करील आणि त्याची एक प्रत केंद्र सरकारला सादर करील.

**लेखे व लेखापरीक्षा.** **१३.** (१) मंडळ, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्याशी विचारविनिमय करून, केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात योग्य ते लेखे व संबंधित अभिलेख ठेवील आणि वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापालास किंवा या अधिनियमाअन्वये मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात त्याने नियुक्त केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला, शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात, भारताचे नियंत्रक व महालेखापालांना जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात, तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील आणि विशेषतः मंडळाची पुस्तके, लेखे संबंधित प्रमाणके व इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा आणि या अधिनियमाअन्वये मंडळाच्या कोणत्याही कार्यालयाचे निरीक्षण करण्याचा अधिकार असेल.

(३) मंडळाच्या लेख्यांची, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून दरवर्षी लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात केलेला कोणताही खर्च, मंडळाद्वारे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना प्रदेय असेल.

(४) मंडळ, लेखापरीक्षकाच्या अहवालासोबत लेख्यांची लेखापरीक्षा केलेली प्रत, विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी केंद्र सरकारला सादर करील.

**वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकाचा अहवाल संसदेसमोर ठेवणे.** **१४.** केंद्र सरकार, वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकाचा अहवाल, ते मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवील.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

**मंडळाला सादर करावयाची विवरणपत्रे.** **१५.** (१) मंडळाकडून वित्तीय साहाय्य मिळणारी औद्योगिक संघटना किंवा संस्था, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी, मंडळाकडे विवरणपत्र सादर करील.

(२) मंडळ, या कलमाअन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही विवरणाच्या अचूकतेची पडताळणी करण्यासाठी पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही औद्योगिक संघटनेस किंवा संस्थेस भेट देण्याकरिता कोणत्याही वेळी एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करू शकेल.

**निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**१६.** (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींना बाध येऊ न देता, मंडळ, या अधिनियमाअन्वये त्याची कामे व कर्तव्ये पार पाडताना, केंद्र सरकार, वेळोवेळी, धोरणविषयक प्रश्नांवर लेखी स्वरूपात त्याला देईल अशा निदेशांनी बद्ध असेल :

परंतु असे की, या पोटकलमाअन्वये कोणतेही निदेश देण्यात येण्यापूर्वी, मंडळाला, व्यवहार्य असेल तितपत त्याची मते मांडण्याची संधी देण्यात येईल.

(२) एखादा प्रश्न धोरणात्मक आहे किंवा नाही, याबाबत केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल.

**मंडळ निष्प्रभावित करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**१७.** (१) जर कोणत्याही वेळी केंद्र सरकारचे असे मत असेल की,—

(क) गंभीर आकस्मिक कारणामुळे, मंडळाला या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तद्न्वये त्याला नेमून दिलेली कामे व कर्तव्ये पार पाडणे शक्य नसेल तर ; किंवा

(ख) मंडळाने, या अधिनियमाअन्वये केंद्र सरकारने दिलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात किंवा या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तद्न्वये त्याला नेमून दिलेली कामे व कर्तव्ये पार पाडण्यात सातत्याने कसूर केली असेल तर आणि अशा कसुरीमुळे मंडळाची आर्थिक स्थिती किंवा मंडळाचे प्रशासन बिघडले तर ; किंवा

(ग) सार्वजनिक हितार्थ तसे करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असेल तर, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी मंडळ निष्प्रभावित करू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये मंडळाला निष्प्रभावित करणारी अधिसूचना प्रसिद्ध केल्यावर,—

(क) सर्व सदस्य, निष्प्रभावित केल्याच्या दिनांकापासून त्यांची पदे रिक्त करतील ;

(ख) या अधिनियमाअन्वये किंवा त्याच्या तरतुदींद्वारे मंडळाने किंवा त्याच्या वतीने, जे वापरण्यात येतील असे सर्व अधिकार किंवा जे पार पाडण्यात येतील अशी सर्व कामे किंवा कर्तव्ये, पोटकलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित करण्यात येईपर्यंत, केंद्र सरकार निदेश देईल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती वापरतील किंवा पार पाडतील ; आणि

(ग) मंडळाच्या मालकीची किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली सर्व मालमत्ता, पोटकलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित करण्यात येईपर्यंत केंद्र सरकारकडे निहित असेल.

(३) पोटकलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावाचा कालावधी समाप्त झाल्यावर, केंद्र सरकार, नव्याने नियुक्ती करून त्याद्वारे मंडळ पुनर्घटित करू शकेल आणि अशा प्रकरणी, पोटकलम (२) च्या खंड (क) अन्वये ज्यांनी त्यांची पदे रिक्त केलेली असतील अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती, नियुक्तीसाठी अपात्र असल्याचे मानण्यात येणार नाही :

परंतु असे की, केंद्र सरकार, निष्प्रभावाचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, या पोटकलमाअन्वये कारवाई करू शकेल.

(४) केंद्र सरकार, पोटकलम (१) अन्वये काढलेली अधिसूचना आणि या कलमाअन्वये हाती घेण्यात आलेल्या कोणत्याही कारवाईचा पूर्ण अहवाल आणि अशी कारवाई करण्यामागची परिस्थिती, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवील.

**प्रत्यायोजन.**

**१८.** मंडळ, लेखी स्वरूपातील सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, या अधिनियमाअन्वये (कलम २१ खालील अधिकार वगळून) त्याला आवश्यक वाटतील असे त्याचे अधिकार व कामे, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, कोणत्याही असल्यास, अटी व शर्तीस अधीन राहून, मंडळाच्या अध्यक्षास किंवा इतर कोणत्याही सदस्यास किंवा कोणत्याही अधिकाऱ्यास प्रत्यायोजित करू शकेल.

**सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.** **१९.** या अधिनियमाअन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांअन्वये किंवा विनियमांअन्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा तसे करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी केंद्र सरकारविरुद्ध किंवा मंडळाविरुद्ध किंवा त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही समितीविरुद्ध किंवा मंडळाच्या किंवा अशा समितीच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध किंवा शासनाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध किंवा केंद्र सरकारने किंवा मंडळाने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.** **२०.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमांमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ च्या पोटकलम (५) अन्वये मंडळाच्या सदस्यांच्या अर्हता व अनुभव, पदावधी व इतर भत्ते ;

(ख) कलम ३ च्या पोटकलम (६) अन्वये अध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये ;

(ग) कलम ५ अन्वये अवेक्षण समिती घटित करणे ;

(घ) कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये समित्या घटित करणे ;

(ङ) कलम ८ च्या पोटकलम (१) खालील अर्जाचा नमुना ;

(च) मंडळ, कलम ११ अन्वये त्याचा अर्थसंकल्प आणि कलम १२ अन्वये त्याचा वार्षिक अहवाल ज्या नमुन्यात व ज्या वेळेत तयार करील, तो नमुना व ती वेळ ;

(छ) कलम १३ च्या पोटकलम (१) अन्वये वार्षिक लेखा विवरणपत्राचा नमुना आणि त्या कलमाच्या पोटकलम (४) अन्वये, ज्या दिनांकापूर्वी लेख्यांच्या लेखापरीक्षेची प्रत, केंद्र सरकारला सादर करता येईल तो दिनांक ;

(ज) नियमांद्वारे, विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी किंवा ज्याबाबत तरतूद करावयाची आहे किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**मंडळाचा विनियम करण्याचा अधिकार.** **२१.** (१) मंडळ, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी सर्वसाधारणपणे, या अधिनियमांशी व नियमांशी सुसंगत असतील असे विनियम, केंद्र सरकारच्या पूर्व मान्यतेने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तयार करू शकेल.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध येऊ न देता, अशा विनियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ४ च्या पोटकलम (२) अन्वये मंडळाचे सचिव आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांची अर्हता व अनुभव, वेतन व भत्ते यांसह त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ख) कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये मंडळाला ज्या नमुन्यात व ज्या वेळेत विवरणपत्रे सादर करता येतील तो नमुना व ती वेळ.

**नियम व विनियम संसदेपुढे ठेवणे.** **२२.** या अधिनियमाअन्वये केलेला प्रत्येक नियम आणि विनियम, तो केल्यानंतर, होईल तितक्या लवकर, एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेला असेल अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले असेल तर किंवा तो नियम किंवा विनियम केला जाऊ नये याबाबत दोन्ही

सभागृहांचे मतैक्य झाले असेल तर, तो नियम किंवा विनियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी, त्या नियमाअन्वये किंवा विनियमाअन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.